MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १२ अंक : १ पाने : १२ ■ डिसेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

अनेक चांगल्या अनुभवांनी अधोरेखित होऊन गेलेले एक वर्ष नुकतेच संपले आणि प्रगतीची नवी संधी व आव्हाने देणारे एक नवे वर्ष सुरु झाले. आपण सर्वांनी गेल्या वर्षी आपली जबाबदारी पार पाडली आणि कंपनीला अधिक कार्यक्षम बनविण्यास साथ दिली तशीच या नव्या वर्षात मिळेल, याची मला पूर्ण खात्री आहे.

आपल्या सर्वांना नवीन वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. आपणा सर्वांना चांगले आरोग्य, मनशांती आणि आनंद लाभो. उत्साही, आनंदी आणि कार्यमग्न राहिले की या गोष्टी आपोआप मिळतात, असा अनुभव आपल्याला आलाच असेल. जो वर्तमानात सर्व काळजी घेतो, त्याला भविष्याची काळजी करावी लागत नाही. याचा अर्थ आपले वर्तमानच भविष्य घडवत असते.

- *सर्व विभागांचा घेतला आढावा*
- *प्रलंबित कामे मार्गी, नवीन आव्हाने स्वीकारा*
- *कार्यालयीन सुधारणा आवश्यक*
- *कायम नवीन शिकत राहा*
- *सकारात्मकता असायला हवी*

गेल्या वर्षातील कार्याचा आढावा घेतला असता असे दिसते की, गेल्या वर्षी विजेच्या मागणीमध्ये नगण्य वाढ झाली आहे. त्यामुळे महापारेषण कंपनीपुढे आपल्या पारेषण प्रणालीच्या वाढीसंदर्भात तसे मोठे आव्हान नव्हते. अशा वेळी आपल्या प्रस्थापित पारेषण प्रणालीत सुधारणा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे अनेक प्रलंबित कामे मार्गी लागली. वीज यंत्रणा आणि प्रणालीचे सक्षमीकरण करणे ही काळाची गरज होती. त्यातील अनेक गोष्टी यावर्षी पूर्ण करता आल्या. यामध्ये राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे व अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी, स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता, विधी या विभागांनी आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करून महत्त्वाची भूमिका बजावली.

यामध्ये राज्य पारेषण उपक्रम विभागाने दुर्गम भागांसाठी योजना केल्या. नंदुरबार, धडगाव, जव्हार, नागभीड, देवरी, साकोली या दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये उपकेंद्रे करण्याचे पंचवार्षिक आराखड्यात अंतर्भूत केले आहे व प्रकल्प योजना विभागाने त्यांस बोर्डाची मान्यता घेतली. अभिकल्प, कंत्राटे आणि अनुश्रावक विभागाने प्रलंबित व अपूर्ण कामे मार्गी लावली. त्यामध्ये उपकेंद्रे, संलग्न वाहिन्या ही कामे पूर्णत्वास नेली. अंजनगाव, मालेगाव, कृष्णूर, सेनगाव येथील प्रकल्प मार्गी लागले. यासाठी त्यांनी संबंधित जिल्हाधिकारी व प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधला. संचलन व सुव्यवस्था विभागाने Reactive Power Compensation व क्षमता वाढ योजनेची वेळेत कार्यवाही केली. स्वयंचलन आणि संचार विभागाने ऑटोमेशन स्कीम, स्काडा सिस्टीम सर्व्हिसमध्ये घेणे, कम्युनिकेशनची व्यवस्था करणे, मोठ्या धर्तीवर NTAMC सेंटर करण्यासाठी भर दिला आहे. मानव संसाधन विभागाने तांत्रिक विभागाच्या कर्मचारी मानांकनाच्या आढाव्याचे कार्य पूर्ण केले. वित्त विभागासाठी कंपनीच्या उत्पन्नात घट झाल्यामुळे हे वर्ष थोडंसं आव्हानात्मक आणि अडचणीचे होते. तरीही या विभागाने त्यावर मात केली. राज्य भार पारेषण केंद्राने उपकेंद्रांत उपकरणे बसविली. उपकेंद्रातून SLDC पर्यंत डाटा कम्युनिकेशन लाईन बसविली. डाटा आल्यानंतर SLDC च्या स्काडा प्रणालीमध्ये या डाटांना अंतर्भुत करण्याचे काम गतीने केले.

स्थापत्य विभागाने STU प्लॅनप्रमाणे MBR मंजुरीनुसार जमिनी अधिग्रहण करण्याचे काम वेळेवर करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. पुणे, कळवा येथे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीसाठी मान्यता घेतली आहे. तसेच बाभळेश्वर, जेजुरी, लोणावळा येथील प्रशिक्षण केंद्राच्या इमारतींचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता, विधी विभागांनीही मोलाची कामगिरी बजावली.

सांघिक कार्यालय हे तर महापारेषणचे हृदय (हार्ट) आहे. काम आणि कामांचे अनुकरण याबाबत या कार्यालयाने उत्तम उदाहरण घालून दिले पाहिजे. हे कार्यालय मानकीकरण व सुस्पष्ट मार्गदर्शक तसेच कार्यासंदर्भातील नामांकने क्षेत्रीय कार्यालयाकरिता



**राजीव कुमार मित्तल (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

तयार करते. उत्पादकता व परिणाम, वेळेवर प्रस्तावांची मंजुरी यामध्ये प्रत्येकांची भूमिका महत्त्वाची आहे. ही भूमिका प्रत्येकाने मान्य केल्यानेच आपण हा टप्पा गाठू शकलो.

कोणत्याही कामात तीन गोष्टींना अतिशय महत्त्व असते, त्यातील पहिली म्हणजे जीवनामध्ये निरंतर सुधारणा अत्यावश्यक असते. दुसरे म्हणजे कायम नवीन शिकणं आवश्यक असते. तिसरी तेवढीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे सकारात्मकता. असा एक ठसा आपण सर्वांनी गेल्या वर्षी उमटवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे नव्या वर्षाच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. त्या अपेक्षा ही नवी आव्हाने आहेत, असे आपण म्हणूयात आणि त्या आव्हानाचे स्वागत करूया. हे काम दिलेल्या मुदतीत आणि वेळेवर व्हावे, यासाठी सर्व विभाग समन्वय साधून काम करत आहेत. यात आपण कोठे मागे राहणार नाहीत, हे आवर्जून पाहिले पाहिजे. मला खात्री आहे, की या आव्हानावर आपण सहजपणे मात करू. आपल्या मनात असलेल्या इच्छा पूर्ण होवोत आणि आपली स्वप्ने साकार होवोत, हीच सदिच्छा.

**शुभेच्छांसह..!**

**– राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई :** राज्यस्तरीय विद्युत सुरक्षा सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे. याप्रसंगी ऊर्जा राज्यमंत्री श्री. मदन येरावार, प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, श्री. राजीवकुमार मित्तल, श्री. विश्वास पाठक, श्री. देवाशिष बॅनर्जी, श्री. अशोक सेठी, श्री. सु.रा.बागडे.

## ■ विद्युत सुरक्षेसाठी जनतेने सहकार्य करावे, ऊर्जामंत्र्यांचे आवाहन ■

# राज्यस्तरीय विद्युत सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

वीज हाताळणी करताना गेल्या वर्षात १२६९ लोकांची प्राणहानी झाली. विजेच्या वाढत्या मागणीसोबत या क्षेत्रात होणारे अपघात ही चिंतेची बाब आहे. ग्रामीण भागात अपघाताचे वाढते प्रमाण पाहता यंत्रणेसोबतच जनतेनेदेखील विद्युत सुरक्षेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्यस्तरीय विद्युत सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन ऊर्जामंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री श्री. मदन येरावार, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीवकुमार मित्तल, सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे श्री. देवाशिष बॅनर्जी, टाटा पॉवरचे कार्यकारी संचालक श्री. अशोक सेठी, बेस्टचे अधिकारी श्री. ओहळ उपस्थित होते.

ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, वीज उपकरणाची हाताळणी करताना अगदी छोट्या गोष्टीमुळे, दुर्लक्षामुळे,निष्काळजीपणामुळे अपघात होतो. अपघात टाळण्यासाठी विद्युत निरीक्षक कार्यालयाने राज्यभर विद्युत अपघाताच्या धोकादायक ठिकाणाची तपासणी करावी. या सप्ताहात महावितरण, मुख्य निरीक्षक विद्युत व खासगी वीज वितरण कंपन्यानी ही मोहीम राबवावी. शून्य अपघात हे आपले ध्येय ठेवून यंत्रणांनी व जनतेनेही यात सहभाग घ्यावा, असे आग्रही आवाहन त्यांनी केले.

शासनातर्फे विद्युत निरीक्षक कार्यालय सक्षम करण्यात येत आहे. या कार्यालयाच्या संकेतस्थळाद्वारे विद्युत सुरक्षाविषयक कामकाज अधिक लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ग्रामीण भागातील बऱ्याच ठिकाणी डी.पी. ची झाकणे उघडे राहून अपघात होतो. महावितरणने यासाठी विशेष मोहिम घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. सुरक्षा सप्ताहाद्वारे जाणीव जागृती होईलच, मात्र यंत्रणेसोबतच लोकसहभाग असला तरच अपघात विरहित विद्युत सुरक्षा हे ध्येय साध्य होईल.

ऊर्जा हा विकासाचा कणा असल्याचे सांगून राज्यमंत्री श्री. मदन येरावार यांनी विद्युत हाताळणी करताना ग्राहकांची व वीज क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची जीवितहानी होऊ नये. सुरक्षाविषयक बाबींचा मोठ्या प्रमाणावर समाज माध्यमांद्वारे प्रचार, प्रसार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. वीज क्षेत्राच्या वाढत्या विस्तारामुळे वीज हाताळताना होणारे अपघात टाळण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून हा सप्ताह आयोजित करण्यात येत असल्याचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह यांनी सांगितले.

विद्युत निरीक्षक कार्यालयाच्या www.cei.maharashtra.gov.in संकेतस्थळाचे उद्घाटन यावेळी श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. तसेच अपघात विरहित वीज वितरण करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य विद्युत निरीक्षक श्री. सु. रा. बागडे, संचलन श्री. आशिष भिडे तर आभार विद्युत निरीक्षक कार्यालयाचे श्री. सुनील बोरसे यांनी मानले.



## ‘महापारेषण’ची घोडदौड

या नवीन उपकेंद्रासह सध्याच्या उपकेंद्रांमध्ये मिळून ३५८९६.५ एमव्हीएपर्यंत क्षमतेत वृद्धी



# महापारेषण कंपनीच्या चित्ररथाला तृतीय क्रमांक



**शिवाजी पार्क, मुंबई :** प्रजासत्ताकदिनी ऊर्जा विभागाच्या (महापारेषण) सौर ऊर्जा या चित्ररथास तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी श्री. राजगोपाल देवरा यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे.




■ *टीम महापारेषण, मुंबई*

*महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या (राजशिष्टाचार) वतीने गतवर्षीच्या प्रजासत्ताक दिनाच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईच्या दादरमधील शिवाजी पार्क येथे आयोजित मुख्य शासकीय समारंभात सहभागी झालेल्या ऊर्जा विभागाच्या (महापारेषण) सौर ऊर्जा या चित्ररथास तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.*

*यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी श्री. राजगोपाल देवरा यांच्या हस्ते हा पुरस्कार 'महापारेषण'ला देण्यात आला. यावेळी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यंदाच्या २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताकदिनी शिवाजी पार्क, मुंबई येथील समारंभात हा पुरस्कार देण्यात आला. गतवर्षीच्या चित्ररथामध्ये कृषी विभागाच्या राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाने प्रथम क्रमांकाचा, राज्य निवडणूक आयोगाने दुसरा तर ऊर्जा विभागाच्या 'महापारेषण'ने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. या पुरस्कारामुळे 'महापारेषण'चे सर्वत्र अभिनंदन होत आहे.*

---

### ■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिक्रिया ■

# सौभाग्य योजनेतून वीज कनेक्शन देण्याची घोषणा स्वागतार्ह

■ *टीम महापारेषण, मुंबई*

सौभाग्य योजनेतून वीज कनेक्शन नसलेल्या देशातील ४ कोटी कुटुंबांना मोफत वीज कनेक्शन देण्याची अर्थमंत्र्यांची घोषणा स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. १८ कोटी महिलांना उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून गॅस कनेक्शनचा निर्णय ग्रामीण व गरीब महिलांना दिलासा देणारा आहे. महिला बचत गटांना ४२ हजार कोटींवरून ५५ हजार कोटी कर्ज देण्याचा निर्णय गरीब महिलांना सक्षम व स्वत:च्या पायावर उभे करणारा आहे असेही ते पुढे म्हणाले.

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सादर केलेला अर्थसंकल्प शेती व ग्रामीण भारताच्या विकासासह ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणारा असून बेरोजगार, ग्रामीण भागातील महिला,पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण सर्वच क्षेत्राच्या विकासाला चालना देणारा असल्याची व या अर्थसंकल्पाचे स्वागत करीत असल्याची प्रतिक्रिया राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली आहे.



## भंडारा जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी श्री. चंद्रशेखर बावनकुळे

■ *टीम महापारेषण, मुंबई*

राज्याचे ऊर्जा व उत्पादन शुल्क मंत्री तसेच नागपूरचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची शासनाने भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्ती केली आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंबंधी शासकीय परिपत्रक जारी केले आहे.

यापूर्वी श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची भंडारा जिल्ह्याचे सहपालकमंत्री म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर आता पालकमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. बावनकुळे यांच्याकडे आता नागपूर आणि भंडारा या दोन जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

---



## 'महापारेषण'ची घोडदौड

१३१७२ सर्किट किलोमीटरच्या ईएचव्ही वीजवाहिनीची निर्मिती.



## निवड



## `महापारेषण`च्या मुख्य महाव्यवस्थापक (विवले)पदी सीए श्री. अनिल कालेकर

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (विवले)पदी सीए श्री. अनिल नागेंद्र कालेकर यांची निवड झाली. महापारेषण कंपनीत ते मुख्य महाव्यवस्थापक (विवले) या पदावर दि. १ फेब्रुवारी २०१८ पासून प्रतिनियुक्तीवर रुजू झाले आहेत.

सीए श्री. कालेकर यापूर्वी महावितरण कंपनीमध्ये महाव्यवस्थापक (विवले) म्हणून कार्यरत होते. त्यांनी `महावितरण`मध्ये असताना सांघिक लेखा व वीज खरेदी विभागात महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

श्री. कालेकर हे चार्टर्ड अकौटंट (CA), कॉस्ट अकौटंट (CMA) व कंपनी सेक्रेटरी (C.S.) या वित्तक्षेत्रातील पदवीधारक आहेत. एम.कॉम या पदव्युत्तर पदवी परीक्षेत शिवाजी विद्यापीठातून पहिल्या क्रमांकाने ते उत्तीर्ण असून सुवर्णपदकप्राप्त आहेत. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया व दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया या भारतातील संस्थेचे Fellow सदस्य आहेत.

## नववर्षाभिनंदन!




**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी व दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, शेजारी सर्वश्री संचालक (वित्त) विनायक साठे, संचालक (संचलन) गणपत मुंडे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे.

# मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा नववर्षानिमित्त महापारेषण परिवारास शुभसंदेश

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वार्षिक दैनंदिनी व दिनदर्शिकेचे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे उपस्थित होते.

सुरवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी नववर्षाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संदेश दिला. गेल्या वर्षात राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे आणि अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी,स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता व विधी या विभागांनी आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करून महत्त्वाची भूमिका बजावली. अशाच प्रकारे यावर्षी देखील आपल्या विभागाची जबाबदारी पार पाडल्यास




पर्यायाने कंपनीच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहील. कोणत्याही कामात तीन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. त्यातील पहिली म्हणजे जीवनामध्ये निरंतर सुधारणा अत्यावश्यक आहे. ती सुधारणा आपण केली पाहिजे. दुसरे म्हणजे कायम नवीन शिकणं आवश्यक आहे. त्याचबरोबर सकारात्मकता ठेवायला हवी.

याप्रसंगी महाव्यवस्थापक (मा. सं.-मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, कंपनी सचिव श्रीमती विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (विवले, प्रभारी) श्रीमती अंजू गुप्ता, विधी सल्लागार श्री. शिवाजीराव पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, महाव्यवस्थापक (मा. सं.-आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्री. आर.एल.गायकवाड, श्री. श्रीकांत राजूरकर, श्री. एन.एस. तेलतुंबडे, श्रीमती चारुता बेंद्रे यांचेसह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...

# `महापारेषण`मध्ये ६९ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

■ ***टीम महापारेषण, मुंबई***

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ६९ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच `महापारेषण`च्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी ध्वजारोहण केले. यावेळी `महापारेषण`चे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुधीर वानखेडे, शिष्टाचार अधिकारी अनिल कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



१



२

*१. **प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** `महापारेषण`च्या मुख्यालयात ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल.*

*२. ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना मुख्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग.*

---

## ■ विद्युत सुरक्षेबाबत माहितीपत्रके वितरित ■

# विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित्त पंढरपुरात प्रबोधन

■ ***टीम महापारेषण, पंढरपूर***

विदयुत सुरक्षा सप्ताहानिमित्त विद्युत निरीक्षक कार्यालय सोलापूर आणि महापारेषण कंपनीतर्फे ११० के.व्ही. उपकेंद्र पंढरपूर येथे विदयुत सुरक्षा संदर्भात प्रबोधन करण्यात आले. यावेळी सोलापूर विद्युत निरीक्षक कार्यालयाचे सहाय्यक अभियंता श्री. बबन इंगळे यांनी विजक्षेत्रात काम करताना घ्यावयाची काळजी याबद्दल उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. विजेचे काम करताना योग्य संवाद साधणे, कामांबाबत वरिष्ठांच्या तसेच सहकारी कर्मचाऱ्यांच्या संपर्कात राहणे, आय.एस.आय. मार्क उत्पादनांचा कामात वापर करणे, काम करताना पुरेशा सुरक्षा साधनांचा वापर करणे, उपकेंद्रांमध्ये सामानाची ने-आण करताना घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी उपकार्यकारी अभियंता सर्वश्री अजित गायकवाड, किशोर राऊत, संदीप मोहितकर, वरिष्ठ यंत्रचालक दत्तात्रय कदम, प्रधान तंत्र प्रकाश घोडके, विकास सर्वगोड, सुनील गाजरे यांनी कामकाजातील अनुभव सांगितले.

यावेळी कर्मचाऱ्यांना विदयुत सुरक्षेबाबत प्रतिज्ञा देण्यात आली व विदयुत सुरक्षेबाबत माहितीपत्रके वितरित करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ११० के. व्ही. पंढरपूर उपकेंद्र, २२० के. व्ही. पंढरपूर उपकेंद्र आणि वाहिनी उपविभाग, पंढरपूरच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**विद्युत अपघाताचे एकच कारण, सुरक्षा साधनांचे व उपायांचे विस्मरण**



**पंढरपूर :** विदयुत सुरक्षा सप्ताहानिमित्त विद्युत निरीक्षक कार्यालय सोलापूर आणि महापारेषण कंपनीतर्फे विदयुत सुरक्षा संदर्भात प्रबोधन करण्यात आले. याप्रसंगी सर्वश्री बबन इंगळे, अजित गायकवाड, किशोर राऊत, संदीप मोहितकर व अन्य कर्मचारी.



आई-वडिलांसोबत मध्यभागी प्रथमेश हिरवे.

# झोपडपट्टी ते इस्त्रो व्हाया महापारेषण; मुंबईच्या प्रथमेश हिरवेची गगनभरारी

## ■ दहा बाय दहाच्या खोलीत राहून घेतले शिक्षण ■

■ टीम महापारेषण, मुंबई

झोपडपट्टीतील दहा बाय दहाची खोली आणि घरातील परिस्थितीवर जिद्दीने मात करीत पवई येथील प्रथमेश हिरवे या २५ वर्षांच्या तरुणाने थेट 'इस्त्रो'मध्ये पाऊल ठेवले आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत शास्त्रज्ञ म्हणून अवकाश भरारी घेणारा प्रथमेश हा मुंबईतील पहिला मराठी युवक ठरला आहे. चंदीगड येथे 'इस्त्रो'चा इलेक्ट्रीकल इंजिनिअर म्हणून तो रुजू झाला आहे.

मुंबईतील पवई येथील झोपडपट्टीतील ही आहे दैदिप्यमान यशाची कहाणी. मुंबई महानगरपालिका शाळेत शिक्षक असलेले सोमा हिरवे यांचा प्रथमेश हा मोठा मुलगा, तर बारावी विज्ञान शाखेत शिकत असलेला निखिल हा धाकटा मुलगा. प्रथमेशला दहावीत ७७.५३ टक्के गुण मिळाल्याने वडिलांनी त्याची कलचाचणी करवून घेतली. त्यावेळी तज्ज्ञांनी त्याला कला शाखेकडे जाण्याचा सल्ला दिला. प्रथमेशने इंजिनिअर बनण्याचा दृढनिश्चय केला. विलेपार्ले येथील भागुबाई मफतलाल पॉलिटेक्निकमध्ये २००७ मध्ये त्याने इंजिनिअरिंगसाठी प्रवेश घेतला.

दहावीपर्यंतचे शिक्षण मराठीतून झाल्यामुळे इंजिनिअरिंगचे इंग्रजी माध्यमातील शिक्षण त्याला जड जाऊ लागले. याबाबत प्रथमेश सांगतो, प्राध्यापकांनी इंग्रजी वाचनाची आवड लावून ही भीती घालवली. अभियांत्रिकीत ८४ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीतून दुसरा आलो. दरम्यान, एल ॲन्ड टी स्वीच गिअर आणि टाटा पॉवरमध्ये वर्षभर इंटर्नशीप करण्याची संधी मिळाली. त्यानंतर नवी मुंबईच्या श्रीमती इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून २०१४ मध्ये पदवी संपादन केली. पदवीत मुंबई विद्यापीठातून २५ वे रँकिंग आले. हैदराबादच्या एसीई इंजिनिअरिंग ॲकॅडमी संस्थेत अभियांत्रिकीशी निगडित स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असतानाच प्रथमेशने ऑक्टोबर २०१५ मध्ये इस्त्रोमध्ये परीक्षा दिली होती.

प्रथमेशच्या या कामगिरीबाबत प्रथमेशच्या आई-वडिलांना मोठा अभिमान वाटतो आहे. मुलाने दिवस-रात्र केलेल्या मेहनतीला खऱ्या अर्थाने फळ मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. प्रथमेशला आता स्वतःच्या कुटुंबाला एक चांगले घर आणि चांगले जीवनमान देण्याची इच्छा आहे. पवई येथील झोपडपट्टीमधील एका तरुणाने फक्त जिद्द आणि मेहनतीच्या जिवावर एवढे मोठे यश मिळविल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### अखेर कष्टाचे चीज झाले..!

दहावीपर्यंत पवईतील मिलिंद विद्यालय या मराठी माध्यम शाळेतून शिक्षण घेऊनही प्रथमेशने एवढे मोठे ध्येय गाठले आहे. देशभरातून तब्बल सोळा हजार अर्ज या जागेसाठी आलेले होते. त्यातून ५४ जणांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली होती. मुलाखतीनंतर फक्त नऊ उमेदवार निवडले गेले ज्यातील एक प्रथमेश होता. गेली अनेक वर्षे त्याने घेतलेल्या प्रचंड मेहनतीचे चीज झाले आहे.

### 'महापारेषण'मध्येही सत्कार

महापारेषणमध्ये सहाय्यक अभियंता असलेल्या प्रथमेश हिरवेची इस्त्रोमध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल महापारेषणच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



## 'महापारेषण'ची घोडदौड

२२० किलोवॅट क्षमतेच्या खारघर-कळवा-बोरीवली वीजवाहिनीच्या क्षमतेत वाढ.



## विनम्र अभिवादन!

### ■ महिलांनी सांगितली सावित्रीबाईंच्या कार्याविषयी माहिती ■

# `महापारेषण`मध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १८७ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, मुख्य महाव्यवस्थापक (प्रभारी) (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य विधी सल्लागार श्री. शिवाजीराव पाटील, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन), श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. राजू गायकवाड यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. प्रारंभी अभियंता निशिगंधा बनकर यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपरिचय करून दिला. याप्रसंगी अभियंता भारती प्रजापती यांनी त्यांचा कार्यपरिचय करून दिला. स्मिता वंजारी यांनी सावित्रीबाई फुलेंवर केलेल्या कवितेचे वाचन केले. कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा शिंदे यांनी सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांनी ज्या उदात्त हेतूने सर्वसमावेशक शिक्षणातून समाजसुधारणेंचे कार्य सुरु केले, ते आज साध्य झाले आहे का? याबाबत ऊहापोह करून उपस्थितांना जातभेद व लिंगभेदविरहित समाज निर्माण करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती भारती कांबळे यांनी मानले.

**सावित्रीच्या लेकी..!**



**प्रकाशगंगा इमारत :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सांघिक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी महिला.

## छायाचित्रांतून...



**कोईमतूर** : ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डने आयोजित केलेल्या ऑल इंडिया बास्केटबॉल स्पर्धेमध्ये महापारेषण कंपनीच्या संघाने उपउपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.



प्रकाशगंगा इमारत मुंबई : `महापारेषण`च्या वतीने २५ जानेवारी २०१८ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे डिसेंबर २०१७ ते जानेवारी २०१८

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. संजय कुलकर्णी | कार्यकारी संचालक (प्रणाली) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०१.२०१८ |
| २. | संजय तुळशीराम शिंदे | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा, प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, वाशी | ३१.०१.२०१८ |

## `महापारेषण`चे प्रेझेंटेशन




**हैदराबाद :** येथे आयोजिलेल्या वर्ल्ड जिओस्पेशियल फोरममध्ये `महापारेषण`च्या वतीने भौगोलिक माहिती प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी अन्य देशांच्या प्रतिनिधीसोबत `महापारेषण`चे श्री. विशाल वाघचौरे.

# वर्ल्ड जिओस्पेशियल फोरममध्ये `महापारेषण`चे सादरीकरण

■ *टीम महापारेषण, मुंबई*

हैदराबाद येथे १८ व १९ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित केलेल्या वर्ल्ड जिओस्पेशियल फोरममध्ये `महापारेषण`च्या वतीने भौगोलिक माहिती प्रणालीचे सादरीकरण करण्यात आले.

या फोरममध्ये सुमारे १५ देशांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. या प्रतिष्ठित चर्चासत्रामध्ये `महापारेषण`तर्फे अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली भौगोलिक माहिती प्रणालीचे सादरीकरण ERP PM/ Web GIS Core Team Lead श्री. विशाल वाघचौरे, सौ. रिता आरस व श्री. राहुल भट्ट यांनी केले. India Smart Greed Forum चे अध्यक्ष श्री. रेजिकुमार पिल्लई यांनी वैयक्तिकरित्या या उपक्रमासाठी `महापारेषण`चे अभिनंदन केले आहे.

महापारेषणच्या टीमने ERP आणि GIS क्षेत्रामध्ये आत्मसात केलेला हा विशिष्ट्य प्रकारचा अनुभव आणि कौशल्यांचा उपयोग देशातील अन्य ऊर्जाक्षेत्रातील कंपन्यांनाही व्हावा, यासाठी महापारेषण तत्पर असल्याचे `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी सांगितले.




**हैदराबाद :** येथे आयोजिलेल्या वर्ल्ड जिओस्पेशियल फोरममध्ये सहभागी झालेली `महापारेषण`ची टीम. डावीकडून श्री.महेश भागवत,श्री.राहुल भट्ट, सौ. रिता आरस, श्री.विशाल वाघचौरे.

# तामिळनाडूतील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये `महापारेषण`चा सहभाग

■ *टीम महापारेषण, मुंबई*

आयआयएम तिरुचिरापल्ली, तामिळनाडू येथे दि. २७ ते ३० डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या ११ व्या ISDSI (Indian Subcontinent Decision Science Institute) आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये महापारेषण कंपनीने सक्रिय सहभाग नोंदविला.



**तामिळनाडू :** आयआयएम तिरुचिरापल्ली, तामिळनाडू येथे आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अध्यक्ष व विविध मान्यवरांसोबत महापारेषण कंपनीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा शिंदे.

सांघिक कार्यालय, मुंबई येथे कार्यरत असणाऱ्या कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा शिंदे यांचा शोधनिबंध ''Towards One Nation, One Grid, One Tariff - Power Supply Management in India'' या परिषदेमध्ये सादर करण्यासाठी स्वीकारला गेला होता. परिषदेमध्ये सादर झालेल्या जगभरातील पाचशेपेक्षा जास्त शोधनिबंधामध्ये महापारेषण कंपनीच्या सहभागाची नोंद झाली. विविध विद्यापीठांच्या संशोधन क्षेत्रातील दिग्गजांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये रुची दर्शविली. पुढील अभ्यासासाठी आपल्या कंपनीच्या संपर्कात राहण्याचे ठरविले. यामुळे शिक्षणसंस्था व विविध इंडस्ट्रीजमध्ये समन्वय राहून शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी मदत होईल.

या शोधनिबंधामध्ये श्रीमती वर्षा शिंदे यांना महावितरणमधील अभियंता श्री. निलेश रोहणकर यांचे सहकार्य लाभले. तसेच श्री. विजय सोनावणे, माजी तांत्रिक सदस्य, MERC यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंता श्री. श्रीकांत राजूरकर यांनी या प्रक्रियेमध्ये श्रीमती वर्षा शिंदे यांना पाठिंबा दिला.

# अभियंत्यांसाठी वडोदरा येथे तांत्रिक प्रशिक्षण



**वडोदरा :** ए.बी.बी.इंडिया लिमिटेड यांच्या प्रशिक्षण केंद्रात सुरु असलेल्या १६ व्या तुकडीचा समारोप पार पडला. याप्रसंगी प्रशिक्षणार्थींसोबत महाव्यवस्थापक (मा.सं.,मनुष्यबळ नियोजन) सर्वश्री सुधीर वानखेडे, शशिकांत बाकरे, हसमुख गुजर, त्रिपाठी.

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

वडोदरा येथील ए.बी.बी.इंडिया लिमिटेड यांच्या प्रशिक्षण केंद्रात सुरु असलेल्या १६ व्या तुकडीचा समारोप पार पडला. याप्रसंगी सांघिक कार्यालयाचे महाव्यवस्थापक (मा.सं.,मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. शशिकांत बाकरे, ए.बी.बी.कंपनीचे श्री. हसमुख गुजर व श्री. त्रिपाठी उपस्थित होते.

महापारेषण कंपनीच्या प्रशिक्षण धोरणानुसार वेतनगट १ व २ मधील अभियंत्यांना चार दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षण उत्पादकांच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये आयोजित करण्यात येते. जी.ई.इंडिया लिमिटेड, चेन्नई, ए.बी.बी.इंडिया लिमिटेड, वडोदरा, सिमेन्स लिमिटेड, ठाणे, इ.एस.सी.आय.हैदराबाद व एन.पी.टी.आय. नागपूर येथे निगा व सुव्यवस्था, चाचणी, प्रकल्प, आर & सी, स्काडा प्रणाली या विषयांवर अभियंत्यांना चार दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते.

## चंद्रपुरात बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या अभ्यासवर्गास प्रारंभ

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषणच्या सांघिक सामाजिक जबाबदारी व प्रगत कुशल योजनेअंतर्गत बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या अभ्यासवर्गास प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर येथे सुरवात झाली. यामध्ये तीस प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

यावेळी प्रशिक्षण केंद्रप्रमुख सर्वश्री संजय अत्राम, अधीक्षक अभियंता शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) कार्यकारी अभियंते अविनाश वट्टी, कैलास प्रगत, प्रशिक्षण केंद्र समन्वयक उमेश शेंडे तसेच विद्युत निरीक्षणालयातर्फे श्री. चामट व सौ. अपर्णा हिंगे उपस्थित होते. हा अभ्यासवर्ग दि. २८ मार्च २०१८ पर्यंत चालणार आहेत.

महाराष्ट्र शासनाने बेरोजगार पदवी/पदवीधारक विद्युत अभियंत्यांना स्वयंरोजगार करणे सुकर व्हावे यासाठी विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र देण्यासाठी १२ आठवड्याच्या विद्युत सुरक्षा व विद्युत संचमांडणी आराखडा प्रमाणपत्र अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे. हा अभ्यासक्रम महापारेषण, महावितरण, महानिर्मिती, बी.ई.एस.टी., टाटा पॉवर व रिलायन्स एनर्जी लिमिटेड या कंपन्यांच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये राबविण्यात येणार आहे. यासाठी अभ्यासक्रम समिती गठित करण्यात आली आहे.




**चंद्रपूर :** येथे विद्युत अभियंत्यांना मार्गदर्शन करताना प्रशिक्षण केंद्र समन्वयक सर्वश्री उमेश शेंडे, याप्रसंगी अविनाश वट्टी, अधीक्षक अभियंता शशिकांत बाकरे, चामट, संजय अत्राम, कैलास प्रगत.


## प्रादेशिक केंद्रात तंत्रज्ञ श्रेणी-४ प्रशिक्षणास प्रारंभ

महापारेषण कंपनीच्या सरळसेवा भरती योजने अंतर्गत निवड झालेल्या तंत्रज्ञ श्रेणी-४ प्रशिक्षणार्थीचे पायाभूत प्रशिक्षण चंद्रपूर, बाभळेश्वर, वाळुंज, पडघे, जेजुरी व तळंदगे येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रामध्ये सुरु झाले. जेजुरी येथील समारोप समारंभास कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. सूरज वाघमारे हे उपस्थित होते. श्री. वाघमारे यांनी यावेळी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) सर्वश्री शशिकांत बाकरे, जेजुरी प्रशिक्षण केंद्राचे सहप्रमुख व कार्यकारी अभियंता संजय परदेशी, प्रशिक्षण समन्वयक व अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनीलदत्त कुलकर्णी व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच पडघे येथील प्रशिक्षण समारोपाला महाव्यवस्थापक (मा.सं.,मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे उपस्थित होते. सहाय्यक अभियंता (पारेषण) व तंत्रज्ञ श्रेणी-४ यांच्या पायाभूत प्रशिक्षणाचा समारोप सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रशिक्षण केंद्रप्रमुख तथा अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, प्रशिक्षण केंद्र समन्वयक तथा उपकार्यकारी अभियंता श्री. सुनील शेणवा व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### 'महापारेषण'ची घोडदौड

फेज-२ अंतर्गत ६१४ कोटींच्या खर्चाच्या १३ वीज पारेषण वाहिन्या टाकणे आणि एक उपकेंद्र स्थापन करण्यासाठी मंजुरी मिळवण्याची प्रक्रिया सुरु.



■ आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण ■

# नाशिकमध्ये आंतर मंडळीय क्रीडा स्पर्धा

■ *टीम महापारेषण, नाशिक*

अऊदा प्रकल्प मंडळ नाशिक यांच्या वतीने महापारेषण कंपनी परिमंडळ नाशिक अंतर्गत आंतर मंडळीय क्रीडा स्पर्धा एन.टी.पी.एस.मैदान, एकलहरे, नाशिक येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे उदघाटन महानिर्मितीच्या नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. उमाकांत निखारे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अऊदा प्रकल्प नि संवसु परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके होते.

या क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी महानिर्मिती कंपनीचे उपमुख्य अभियंता श्री. खानापूरकर, प्राचार्य श्री. रमेश अलगट उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, शरद लोखंडे, नासीर काद्री, किशोर जाधव, जगन्नाथ चुडे, विजय नलावडे, प्रमोद गोडसे, सुनील तिरमारे, श्रीकृष्ण नवलाखे, विनोद ढोरे, नामदेव धनवडे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

**`सावरपाडा एक्स्प्रेस`चं जंगी स्वागत..!**



**नाशिक :** महापारेषण कंपनी परिमंडळ नाशिक अंतर्गत आंतर मंडळीय क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत हिचे स्वागत करताना मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके. शेजारी उमाकांत निखारे, खानापूरकर, रमेश अलगट व अन्य अधिकारी.

■ सांस्कृतिक कार्य संचालनालयाची घोषणा ■

# राज्य नाट्य स्पर्धेत `महापारेषण`चे `सुईधागा` प्रथम

**घट्ट नात्यांची वीण..!**





■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत मुंबई केंद्रातून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या सुईधागा नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रसिद्धीपत्रकाव्दारे केली आहे.

या स्पर्धेमध्ये २३ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे मुंबई केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे : दिग्दर्शन-प्रथम पारितोषिक कुणाल आळवे (नाटक-सुईधागा), नेपथ्य-प्रथम पारितोषिक रॉबिन (नाटक-सुईधागा), उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक-पल्लवी देशपांडे (नाटक-सुईधागा), प्रकाश योजना-व्दितीय पारितोषिक संजय तोडणकर (नाटक-सुईधागा). स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. रमेश कोटस्थाने, श्री. सुरेश बारसे, श्री. प्रकाश मोरे यांनी काम पाहिले.



**'महापारेषण'ची घोडदौड**

फेज-१ ला मंजुरी. त्याअंतर्गत ३६७ कोटी खर्चुन २७ वीजपारेषण वाहिन्यांची निर्मिती करण्यासाठी निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु.





**जेएनपीटी मैदान, उरण :** महापारेषणच्या वतीने आंतर परिमंडळ क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, शेजारी श्री. संजय शिंदे, श्रीमती मनिषा जाधव, श्री. अनंत पाटील, श्री.जयंत वीके, श्री. विकास बढे, श्री.संदीप कलंत्री, श्रीमती शीतल गेडाम, श्री. भूषण बल्लाळ, श्रीमती जुईली वाघ, श्री. भरत पाटील, श्री. सतीश गहेरवार आदी.

## ■ सर्वसाधारण विजेतेपद नागपूरकडे तर औरंगाबादला उपविजेतेपद ■

# खेळांमुळे जीवनात नवीन ऊर्जा : श्री.गणपत मुंडे

■ *टीम महापारेषण, वाशी/मुंबई*

``प्रत्येक खेळांत हार-जीत असते. त्यामुळे निराश न होता खेळाडूंनी सातत्य राखून आपला खिलाडूपणा कायम जपला पाहिजे. खेळांमुळे जीवनात नवीन ऊर्जा मिळते``, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) च्या वतीने उरणच्या जेएनपीटी मैदानावर आयोजिलेल्या आंतर परिमंडळ क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मुंडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजय शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी जेएनपीटीच्या प्रबंधक श्रीमती मनिषा जाधव, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, मुख्य अभियंता श्री.जयंत वीके, श्री. विकास बढे, श्री.संदीप कलंत्री, श्रीमती शीतल गेडाम, श्री. भूषण बल्लाळ, श्रीमती जुईली वाघ, श्री. भरत पाटील, श्री. सतीश गहेरवार, श्री. प्रवीण पाटील उपस्थित होते.

**व्हॉलीबॉलचा थरार...**



**जेएनपीटी मैदान, उरण :** महापारेषणच्या वतीने आयोजिलेल्या आंतर परिमंडळ क्रीडा स्पर्धेतील एक क्षण.

सुरवातीला मुख्य औदयोगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांनी अहवाल वाचन केले. शिस्तबद्ध पध्दतीने खेळाडू खेळतात. त्यामुळे खेळांचा दर्जा दिवसेंदिवस वाढत आहे. स्पर्धेमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे. स्पर्धा दरवर्षी होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. मुंडे पुढे म्हणाले, ``स्पर्धा दरवर्षी होण्यासाठी प्रयत्न करू. तसेच खेळाचा दैनिक भत्ता देण्यासाठीही प्रयत्न करू. खेळाडूंनी सातत्य ठेवून महापारेषणचे नाव उंचवावे.``

श्री. संजय शिंदे म्हणाले, `` क्रिकेट आणि व्हॉलीबॉलचा सामना अटीतटीचा झाला. नाट्य आणि क्रीडा स्पर्धा माझ्या मार्गदर्शनाखाली झाल्या, याचा मला अभिमान आहे. खेळाडूंनी सामना जिंकून मला मोठी भेट दिली आहे. जीवनात कायम संघर्ष करत राहा, यश तुमचेच आहे. पुढील वर्षी महिलांचे कबड्डीचे सामने व्हावेत.``

यावेळी सर्वसाधारण विजेतेपद नागपूर परिमंडळाने पटकाविले. औरंगाबाद परिमंडळाने सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविले. यामध्ये नाशिक, नागपूर, अमरावती, वाशी, सांघिक कार्यालय, औरंगाबाद, कराड परिमंडळांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पूजा सावर्डेकर-महाजन व श्री. सिध्दार्थ जाधव यांनी करून शेवटी आभार मानले.



## ‘महापारेषण’ची घोडदौड

ईएचव्ही वाहिनीअंतर्गत संपादित झालेल्या जमिनीसाठी रेडिरेकनरच्या दराहून १५ टक्के अधिक भरपाई.



From the Desk of ED, HR

# कार्यालयीन नातेसंबंधांचा सुवर्णमध्य



आपले कार्यालयातील सहकाऱ्यांशी संबंध कसे असले पाहिजे, याविषयी अनेक जण संभ्रमात असतात. अनेकांना असे वाटते की, हे संबंध वर्किंग रिलेशन्स म्हणूनच ठेवले पाहिजेत, तर अनेकांना असे वाटते की आपली सर्व सुख-दु:खे जशी नातेवाईकांवर अवलंबून असतात, तसे हे जवळचे संबंध असले पाहिजे. पण हे दोन्ही वाटणे, ही दोन टोके आहेत. कार्यालयीन संबंध या दोन्हीचा सुवर्णमध्य आहे. ज्याला हा सुवर्णमध्य साधता आला, तो कार्यालयीन नातेसंबंध चांगले ठेवण्यास यशस्वी झाला, असे म्हणता येईल. असे आदर्श नातेसंबंध ठेवणे फार अवघड आहे, असे मात्र अजिबात नाही. आपणही तसे संबंध ठेवण्यासाठी काय केले पाहिजे, हे आपण पाहूच. पण, त्याआधी आपण अशा चांगल्या संबंधाची गरज समजून घेतली पाहिजे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे कार्यालयात आपली जी भूमिका असते, ती आपली कार्यालयात तर ओळख असतेच पण ती अनेकदा समाजातीलही ओळख असते, हे लक्षात घेतले पाहिजे. कार्यालयात आपण एक समूहजीवन जगत असतो, त्यामुळे त्या समूहजीवनाचे आपल्या जीवनात आणि व्यक्तिमत्व विकासात महत्त्वाचे स्थान आहे, हेही लक्षात घ्यावे लागते. अनेकदा नोकरी लागली म्हणून ज्या कामाची जबाबदारी आपण स्वीकारलेली असते, तीच आपली आयुष्यातील ओळख होते. आपण आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने ती पूर्ण करत असतो. कोणत्याही कार्यालयात काम हे एका साखळीतील कडीसारखे असते. म्हणजे या कामातील प्रत्येक कडी जेवढी मजबूत, सक्षम तेवढे काम चांगले होण्याची शक्यता अधिक. त्यामुळे आपले दुसऱ्यावरील अवलंबित्व आपल्याला मान्य केले पाहिजे. आपल्याला दुसऱ्या सहकाऱ्याने मदत केली पाहिजे, असे आपण म्हणतो तेव्हा आपण वेळप्रसंगी त्यालाही मदत केली पाहिजे, हे विसरता कामा नये.

आपण आपल्या कार्यालयात कोणत्या पदावर आहोत, हे कार्यालयीन कामाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. पण एक माणूस किंवा नागरिक म्हणून आपले स्थान निर्माण करणे, हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. आपल्या कार्यालयीन कामात आणि थेट मानवी संबंध म्हणून आपण सहकाऱ्यांशी आपण कसे वागतो, याला महत्त्व आहे. कारण कार्यालयीन काम करताना आपले अनेकांशी संबंध येतात. त्यावरून आपली कार्यालयातील प्रतिमा ठरत असते. ही प्रतिमा कणाकणाने तयार होत असते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

कार्यालयीन काम जसे परस्परावलंबी असते, तसेच आपल्या व्यक्तिमत्वाला आकार देणारे असते. त्यामुळेच आपल्याला इतरांशी कसे वागायचे, इतरांकडून कामे कशी करून घ्यायची, इतरांच्या मदतीला कधी जायचे आणि इतरांची मदत कशी घ्यायची, हे आपले कामच आपल्याला शिकवत असते. व्यक्तिमत्व विकासाची ही संधीच असते.

कार्यालयात आपण किमान आठ तास काम करत असतो. तासांचा हिशोब केला तर आपल्या नातेवाईकापेक्षा अधिक काळ आपण सहकाऱ्यांसोबत असतो. त्यामुळे आपली सुख-दु:खे आणि आपले मूड हे त्यावर अवलंबून असतात. इतका अधिक काळ आपण ज्या माणसांत राहतो, त्याला महत्त्व आहे. एवढेच नव्हे तर अनेकदा तर आपल्या काही सुख-दु:खात नातेवाईकांपेक्षा हे सहकारीच असण्याचीही शक्यता अधिक असते. त्यामुळे ते आपले सहकारी आहेत, तसेच ते आपले मित्रही आहेत, अशी भावना आपल्या मनात असली पाहिजे.

अनेकांना असे वाटते की आपले मित्र हे कार्यालयाबाहेरचेच असले पाहिजे. पण असा काही नियम असण्याचे कारण नाही. उलट कार्यालयातील सहकारी आपल्याला आणि आपण त्यांना अधिक चांगले ओळखत असल्याने ते आपले अधिक चांगले मित्र होऊ शकतात. शिवाय अनेक गोष्टींत साम्य असल्याने परस्परांत चांगले जमू शकते. कार्यालयीन काम कोरडेपणाने करणे, असा चुकीचा प्रघात आपल्याकडे पडला आहे. वास्तविक हे काम चांगल्या वातावरणात होऊ शकते. तसे ते झाले तर आपले सहकारी आपले मित्र होऊ शकतात. एकाच छताखाली काम करणारे सारख्या स्वभावाचे सहकारी चांगले मित्र होऊ शकतात.

कार्यालयीन नातेसंबंध चांगले ठेवण्यासाठी अर्थातच काही पथ्ये ही सांभाळली पाहिजेत. आपली कार्यालयातील पदसिद्ध भूमिका चांगल्या प्रकारे निभावणे. कार्यालयीन नातेसंबंधाचा कामाच्या उत्पादिकतेवर सकारात्मक परिणाम होऊ देणे, कोणत्याही गटातटात सामील न होणे, जातीपंथांचा परिणाम या संबंधांवर होऊ न देणे, ही त्यातील काही पथ्ये आहेत. कार्यालयीन नातेसंबंधाना आपण अनेकदा कमी महत्त्व देतो, पण ती आपल्या विचार करण्याच्या पद्धतीतील त्रुटी आहे. कारण आपल्याला ओळख देणारे काम आणि तो परिसर आपल्या जीवनात कुटुंबाइतकाच महत्त्वाचा असतो, हे आपण कधी मान्य करत नाही. पण आता ही त्रुटी दूर करण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. तसे केले तर आपले व्यक्तिमत्व तर फुलेलच, पण आपण ज्या कामासाठी एकत्र आलो आहोत, त्या आपल्या देशाच्या आणि समाजाच्या प्रती असलेल्या जबाबदारीला आपण खऱ्या अर्थाने न्याय देऊ शकू.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.